RNI No. MAHBIL /2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक १९] शुक्रवार, मार्च २६, २०२१/चैत्र ५, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

## कणकवली नगरपंचायत, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग

**सूचना**

क्रमांक कनप/नर/६१७/२०२१

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) व कलम (३८) नुसार कणकवली, नगरपंचायत क्षेत्राची विकास योजना सुधारित करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

शासनाने, नगरविकास विभागाकडील निर्णय क्र. GEN १०१७/१२७०/प्र.क्र. १०६/१७ /नावि-१६, दिनांक ३० ऑक्टोबर २००२ अन्वये कणकवली नगरपंचायत स्थापन केलेली आहे. कणकवली शहर मंजूर विकास आराखडा हा TPS १९९९/९६४/CR-१३७/९९/UD-१२, दिनांक ३० सप्टेंबर १९९९ रोजी मंजूर असून दिनांक १५ डिसेंबर १९९९ रोजी अंमलात आणला आहे. त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) व कलम (३८) अन्वये नगरपंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना सुधारित करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये व कलम (३८) अन्वये कणकवली नगरपंचायतीने विकास योजना सुधारित करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा विषय क्र. ०३, दिनांक २४ मार्च २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) नुसार कणकवली नगरपंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा अंतर्भाव करून हद्द दर्शविणारा नकाशा नगरपंचायतीच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६०(साठ) दिवसाच्या आत मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करताना त्या सूचना/हरकतीचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**वैभव विजय साबळे,**
मुख्याधिकारी,
नगरपंचायत कणकवली.

कणकवली,
दिनांक २४ मार्च २०२१.

## KANKAVALI NAGAR PANCHAYAT, KANKAVALI, DISTRICT SINDHUDURG

### Notice

No. KNP/TP/617/2021

**Declaration of Intention to Revision of Development Plan of Kankavali Nagar Panchayat as per section 23(*1*) read with section 21(*2*) and section (38) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* it's Notification No. GEN 1017/ 1270/प्र.क्र. 106/17/नावि-16, dated 18th October 2002 constituted Kankavali Nagar Panchayat. Development plan for Kankavali Nagar Panchayat was sanction on *vide* notification No. TPS 1999/964/CR-137/99/UD-12, dated 30th September 1999 and enforced by dated 15th December 1999. Now it is necessary to revise the Development Plan for the area of Municipal Council/Nagar Panchayat as per section 21(*2*) and Section (38) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Kankavali Nagar Panchayat by its resolution No. 03, dated 24th March 2021 has given consent to declare its intention to revise the Development Plan, as per provision of section 23(*1*) read with section 21(*2*) and section 38 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Kankavali Nagar Panchayat and area of is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council/Nagar Panchayat, as required under section 23(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer Kankavali Nagar Panchayat within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Kankavali,
Dated 24th March 2021.

VAIBHAV VIJAY SABLE,
Chief Officer,
Nagar Panchayat Kankavali.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.